This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

Checked 2012

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. M976 विषय धर्मशास्त्र

नाव. श्रीकृष्णजन्माष्टमीपूजा (मुद्रित)

लेखक/लिपीकार —

पृष्ठ 16 काळ इ.स. 1915 पूर्ण/अपूर्ण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीकृष्णजन्माष्टमीपूजासार्थकथा-

प्रारंभः ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीगोपालकृष्णायनमः ॥ ॥ प्रातःकृतनित्यक्रियःप्राङ्मुखोदेशादिसंकीर्त्यतत्त
त्कालेसप्तम्यादिसत्त्वेपिप्रधानभूतामष्टमीमेवसंकीर्त्य श्रीकृष्णप्रीत्यर्थंजन्माष्टमीव्र
तंकरिष्ये ॥ जयंतीयोगसत्त्वेजन्माष्टमीव्रतंजयंतीव्रतंचतंत्रेणकरिष्येतिसंकल्प
येत् ॥ ताम्रपात्रेजलंगृहीत्वा ॥ वासुदेवंसमुद्दिश्यसर्वपापप्रशांतये ॥ उपवासंक
रिष्यामिकृष्णाष्टम्यांनभस्यहं ॥ अशक्तो फलानिभक्षयिष्यामीत्याद्यूहः ॥ आज
न्ममरणंयावद्यन्मयादुष्कृतंकृतं ॥ तत्प्रणाशयगोविंदप्रसीदपुरुषोत्तम ॥ इतिपा
त्रस्थंजलंक्षिपेत् ॥ ततःसुवर्णरजतादिमय्योमृण्मय्योवाभित्तिलिखितावाप्रतिमा
यथाकुलाचारंकार्याः ॥ तायथा ॥ पर्यंकेप्रसुप्तदेवक्याःस्तनंपिबंतींश्रीकृष्णप्रति
मांनिधाय जयंतीसत्त्वेत्वन्यदेवक्याउत्संगेद्वितीयांश्रीकृष्णमूर्तिंनिधाय पर्यंकस्थ
देवकीचरणसंवाहनपरांलक्ष्मींनिधाय भित्त्यादौखड्गधरंवसुदेवं नंदगोपीगोपा
न्लिखित्वा प्रदेशांतरेमंचकेप्रसूतकन्ययासहयशोदाप्रतिमां पीठांतरेवसुदेवदेव
कीनंदयशोदाश्रीकृष्णरामचंडिकाइतिसप्तप्रतिमाश्चस्थापयेत् ॥ एतावत्प्रतिमा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणाशक्तौवसुदेवादिचंडिकाताःसप्तवायथाचारंयथाशक्तिवाकृत्वा अन्याःस
र्वायथायथंध्यायेदितिभाति ॥ ॥ निशीथासन्नप्राक्कालेस्नात्वाआचम्यप्राणानाय
म्यश्रीकृष्णप्रीत्यर्थंसपरिवारश्रीकृष्णपूजांकरिष्यइतिसंकल्प्य अथवाअस्माकमि
त्यादि जन्माष्टमीव्रतकल्पोक्तफलावाप्तयेधर्मार्थकाममोक्षचतुर्विधपुरुषार्थसिद्ध्य
र्थंसपरिवारश्रीगोपालकृष्णप्रीत्यर्थंयथासंपादितसामग्र्याषोडशोपचारैःपूजांकरि
ष्ये ॥ तदंगंआसनविधिंपुरुषसूक्तादिन्यासान्करिष्येकलशाद्यर्चनंचकरिष्येइति
संकल्प्यतानिकृत्वानिर्विघ्नतासिद्ध्यर्थंगणपतिंषोडशोपचारैःसंपूज्य मूर्तीनांप्राणप्र
तिष्ठांकृत्वाध्यायेत् ॥ पर्यंकस्थांकिन्नराद्यैर्युतांध्यायेत्तुदेवकीं ॥ श्रीकृष्णंबालकंध्या
येत्पर्यंकेस्तनपायिनं ॥ श्रीवत्सवक्षसंशांतंनीलोत्पलदलच्छविं ॥ संवाहयंतींदेव
क्याःपादौध्यायेच्चतांश्रियं ॥ एवंध्यात्वा ॥ सहस्रशीर्षा० देवक्यैनमःइतिदेवकीमा
वाह्य मूलमंत्रेणश्रीकृष्णायनमःश्रीकृष्णमावाहयामीतिआवाह्य लक्ष्मींचावाह्य
देवक्यैवसुदेवाययशोदायैनंदायकृष्णायरामायचंडिकायैइतिनामभिरावाह्य लि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

खितादिदेवताश्च सकलपरिवारदेवताभ्योनमइत्यावाह्य (मूलमंत्रेणसूक्तर्चावा
अत्रावाहितदेवक्यादिपरिवारदेवतासहितश्रीकृष्णायनमइत्यासनपाद्यार्घ्याचम
नीयाभ्यंगस्नानानिदत्वापंचामृतस्नानांतेचंदनेनानुलेपयेत् ॥ शुद्धोदकाभिषेकां
तेवस्त्रयज्ञोपवीतगंधपुष्पाणिधूपदीपौच ॥ विश्वेश्वरायविश्वायतथाविश्वोद्भवाय
च ॥ विश्वस्यपतयेतुभ्यंगोविंदायनमोनमः ॥ यज्ञेश्वरायदेवायतथायज्ञोद्भवायच
॥ यज्ञानांपतयेनाथगोविंदायनमोनमः ॥ इतिमंत्राभ्यांमूलमंत्रादिसमुच्चिताभ्यां
दद्यात् ॥ जगन्नाथनमस्तुभ्यंसंसारभयनाशन ॥ जगदीश्वरायदेवायभूतानांप
तयेनमः ॥ इतिनैवेद्यं ॥ मूलमंत्रादिकंसर्वत्रयोज्यं ॥ तांबूलादिनमस्कारप्रदक्षि
णापुष्पांजल्यंतंकार्यं) ॥ ॥ अथवोद्यापनप्रकरणोक्तविधिनापूजा ॥ सायथा ॥
उक्तप्रकारेणध्यानावाहनेकृत्वा ॥ पुरुषएवेदं० ॥ देवाब्रह्मादयोयेचस्वरूपंनविदु
स्तव ॥ अतस्त्वांपूजयिष्यामिमातुरुत्संगवासिनं ॥ आसनं ॥ एतावानस्य० ॥
अवतारसहस्राणिकरोषिमधुसूदन ॥ नतेसंख्यावताराणांकश्चिज्जानातितत्त्वतः॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पाद्यं ॥ त्रिपादूर्ध्व० ॥ जातःकंसवधार्थायभूभारोत्तारणायच ॥ देवानांचहिता
र्थायधर्मसंस्थापनायच ॥ कौरवाणांविनाशायपांडवानांहितायच ॥ गृहाणार्घ्यं
मयादत्तंदेवक्यासहितोहरे ॥ अर्घ्यं ॥ तस्माद्विराळ० ॥ सुरासुरनरेशायक्षीरा
ब्धिशयनायच ॥ कृष्णायवासुदेवायददाम्याचमनंशुभं ॥ आचमनीयं ॥ यत्पुरु
षेण० ॥ नारायणनमस्तेस्तुनरकार्णवतारक ॥ गंगोदकंसमानीतंस्नानार्थंप्रतिगृ
ह्यतां ॥ स्नानं ॥ आप्यायेत्यादिपंचभिर्मंत्रैः ॥ पयोदधिघृतक्षौद्रशर्करास्नानमु
त्तमं ॥ तृप्त्यर्थंदेवदेवेशगृह्यतांदेवकीसुत ॥ पंचामृतं ॥ मधुवाताइतितृचेनमधु
पर्कस्नानंसमर्पयामि ॥ गंधद्वारां० इति ॥ मलयाचलसंभूतचंदनागरुवासितं ॥
तोयमेतत्सुखस्पर्शंस्नानार्थंप्रतिगृह्यतां ॥ चंदनोदकस्नानं० ॥ कनिक्रददित्यादि
भिःसुगंधितैलोन्मर्दनेनोष्णोदकेनमांगलिकस्नानं ॥ शुद्धोदकस्नानं महाभिषेक
आचमनं ॥ तंयज्ञं० ॥ क्षौमंचपट्टसूत्राद्यंमयानीतांशुकंशुभं ॥ गृह्यतांदेवदेवेश
मयादत्तंसुरोत्तम ॥ वस्त्रं ॥ तस्माद्यज्ञा० ॥ नमःकृष्णायदेवायशंखचक्रधरायच ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ब्रह्मसूत्रेजगन्नाथगृहाणपरमेश्वर ॥ यज्ञोपवीतं ॥ तस्माद्यज्ञा० ॥ नानागंधसमायु
क्तंचंदनंचारुचर्चितं ॥ कुंकुमाक्ताक्षतैर्युक्तंगृह्यतांपरमेश्वर ॥ गंधं ॥ अक्षताश्चसु
रश्रेष्ठ० ॥ अलंकारार्थं० ॥ अहिरिवभोगैःपर्येति० ॥ सुगंधामोदजनकंसर्वदाघ्रा
णतर्पणं ॥ सुरभिद्रव्यजातंयद्भक्त्यातुभ्यंसमर्पये ॥ परिमलद्रव्याणिसौभाग्यद्रव्या
णिसमर्पयामि॥ तस्मादश्वा०॥ पुष्पाणियानिदिव्यानिपारिजातोद्भवानिच ॥माल
तीकेसरादीनिपूजार्थंप्रतिगृह्यतां ॥ पुष्पाणि ॥ अथांगपूजा ॥ श्रीकृष्णायनमः
पादौपूजयामि ॥ संकर्षणायनमःगुल्फौपू० ॥ कालात्मनेनमः जानुनीपू०॥ पुंडरी
काक्षाय० जंघेपू० ॥ विश्वनेत्राय० कटिंपू० ॥ विश्वकर्त्रेन० मेढ्रंपू० ॥ पद्मना
भायनमः नाभिंपू० ॥ परमात्मनेन० हृदयंपू० ॥ श्रीकंठायनमः कंठंपू० ॥ सर्वा
स्त्रधारिणेन० बाहूपू० ॥ वाचस्पतयेन० मुखंपू० ॥ केशवायन० ललाटंपू० ॥ सर्वा
त्मनेन० शिरःपूजयामि ॥ विश्वरूपिणेनारायणायनमःसर्वांगंपूजयामि ॥ अत्र
यथाविभवंसहस्रा १००० ष्टोत्तरशता १०८ न्यतमसंख्यतुलसीदलसमर्पणं कार्यं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अथश्रीकृष्णाष्टोत्तरशतनामावलिः ॥ ॐकारःसर्वत्रादावंतेचनमःशब्दोयोज्यः ॥
ॐ श्रीकृष्णायनमः कमलानाथाय०वासुदेवाय०सनातनाय०वसुदेवात्मजाय०
पुण्याय० लीलामानुषविग्रहाय०श्रीवत्सकौस्तुभधराय०यशोदावत्सलाय०हरये०
चतुर्भुजात्तचक्रासिगदाशंखाद्युदायुधाय० देवकीनंदाय० श्रीशाय० नंदगो
पप्रियात्मजाय० यमुनावेगसंहारिणे० बलभद्रप्रियानुजाय० पूतनाजीवित
हराय० शकटासुरभंजनाय० नंदव्रजजनानंदाय० सच्चिदानंदविग्रहाय० नवनी
तविलिप्तांगाय० नवनीतनटाय० अनघाय० नवनीतनवाहाराय० मुचुकुंदप्रसा
दकाय० २५ षोडशस्त्रीसहस्रेशाय० स्त्रीभंगललिताकृतये० शुकावागमृताब्धीं
दवे० गोविंदाय० गोविदांपतये० वत्सवाट्कुचराय० अनंताय० धेनुकासुरखं
डनाय० तृणीकृततृणावर्ताय० यमलार्जुनभंजनाय० उत्तालतालभेत्रे० तमाल
श्यामलाकृतये० गोपगोपीश्वराय० योगिने० कोटिसूर्यसमप्रभाय० इलापतये०
परंज्योतिषे०यादवेंद्राय० यदूद्वहाय० वनमालिने० पीतवाससे०पारिजातापहार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

काय० गोवर्धनाचलोद्धर्त्रे० गोपालाय० सर्वपालकाय० ५० अजाय० निरंजना
य० कामजनकाय० कंजलोचनाय० मधुघ्ने० मथुरानाथाय० द्वारकानायकाय०
बलिने० वृंदावनांतसंचारिणे० तुलसीदामभूषणाय० मुष्टिकासुरचाणूरमल्लयु
द्धविशारदाय० संसारवैरिणे० कंसारये० मुरारये० नरकांतकाय० स्यमंतकम
णिहर्त्रे० नरनारायणात्मकाय० कुब्जाऋज्वंगकरणाय० मायिने० परमपूरुषाय०
अनादिब्रह्मचारिणे० कृष्णाव्यसनकर्षकाय० शिशुपालशिरश्छेत्रे० दुर्योधनकु
लांतकाय० विदुराक्रूरवरदाय० ७५ विश्वरूपप्रदर्शकाय० सत्यवाचे० सत्यसंक
ल्पाय० सत्यभामारताय० जयिने० सुभद्रापूर्वजाय० विष्णवे० भीष्ममुक्तिप्रदा
यकाय० जगद्गुरवे० जगन्नाथाय० वेणुनादविशारदाय० वृषभासुरविध्वंसिने०
बाणासुरबलांतकाय० युधिष्ठिरप्रतिष्ठात्रे० बर्हिबर्हावतंसकाय० पार्थसारथये०
अव्यक्ताय० गीतामृतमहोदधये० कालीयफणिमाणिक्यरंजितश्रीपदांबुजाय०
दामोदराय० यज्ञभोक्त्रे० दानवेंद्रविनाशनाय० नारायणाय० परब्रह्मणे० पन्नगा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शनवाहनाय०१०० जलक्रीडासमासक्तगोपीवस्त्रापहारकाय० पुण्यश्लोकाय०ती
र्थपदाय० वेदवेद्याय०दयानिधये० सर्वभूतात्मकाय० सर्वग्रहरूपिणे०परात्पराय०
१०८यत्पुरुषं० वनस्पतिरसोद्भूतोगंधाढ्योगंधउत्तमः ॥ आघ्रेयःसर्वदेवानांधूपोयं
प्रतिगृह्यताम् ॥धूपं॥ ब्राह्मणो०॥ त्वंज्योतिःसर्वदेवानांतेजस्त्वंतेजसांपरं ॥ आत्म
ज्योतिर्नमस्तुभ्यंदीपोयंप्रतिगृह्यतां ॥ दीपं ॥ चंद्रमा० ॥ नानारससमायुक्तंभ
क्ष्यभोज्यंचतुर्विधं ॥ नैवेद्यार्थंमयादत्तंगृहाणपरमेश्वर ॥ नैवेद्यं ॥ आचमनं
करोद्धर्तनं ॥ तांबूलंचसकर्पूरंपूगीफलसमन्वितं ॥ मुखवासकरंरम्यंप्रीत्यर्थंप्रति
गृह्यतां ॥ तांबूलं ॥ सौवर्णराजतंताम्रंनानारत्नसमन्वितं ॥ कर्मसाद्गुण्यसिद्ध्य
र्थंदक्षिणांप्रतिगृह्यतां ॥ दक्षिणां ॥ रंभाफलंनारिकेलंतथैवाम्रफलानिच ॥ पूजि
तोसिसुरश्रेष्ठगृह्यतांकंससूदन ॥ फलानि० ॥ श्रियेजातः०नीराजनं० ॥ कर्पूर
दीपं० ॥ नाभ्याआसी० नमोस्त्वनंताय० नमस्कारः ॥ सप्तास्यासन्०यानीका०
प्रदक्षिणाः ॥ यज्ञेन० इत्यादिवेदमंत्रैःपुष्पांजलिं० ॥ पूजांनिवेदयेत् ॥ सर्वोपचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रपूजनसमाप्तौद्वादशांगुलविस्तारंरौप्यमयंस्थंडिलादिलिखितंवारोहिणीयुतंचंद्रं
सोमेश्वरायसोमायतथासोमोद्भवायच ॥ सोमस्यपतयेनित्यंतुभ्यंसोमायवैनमः॥
इतिसंपूज्य ॥ सपुष्पकुशचंदनतोयंशंखेनादाय ॥ क्षीरोदार्णवसंभूतअत्रिगोत्र
समुद्भव ॥ गृहाणार्घ्यंशशांकेशरोहिणीसहितोमम ॥ ज्योत्स्नापतेनमस्तुभ्यंज्यो
तिषांपतयेनमः ॥ नमस्तेरोहिणीकांतअर्घ्यंनःप्रतिगृह्यतां ॥ इतिमंत्राभ्यांचंद्रा
यार्घ्यंदद्यात् ॥ ततःश्रीकृष्णायार्घ्यंदद्यात् ॥ तत्रमंत्रः ॥ जातःकंसवधार्थायभू
भारोत्तारणायच ॥ पांडवानांहितार्थायधर्मसंस्थापनायच ॥ कौरवाणांविनाशा
यदैत्यानांनिधनायच ॥ गृहाणार्घ्यंमयादत्तंदेवक्यासहितोहरे ॥ श्रीकृष्णायइद
मर्घ्यं० ॥ पुराणांतरेतु ॥ क्षीरोदेत्येकेनार्घ्यंदत्त्वा ॥ ज्योत्स्नायाःपतयेतुभ्यं
ज्योतिषांपतयेनमः ॥ नमस्तेरोहिणीकांतसुधावासनमोस्तुते ॥ नभोमंडलदी
पायशिरोरत्नायधूर्जटेः ॥ कलाभिर्वर्धमानायनमश्चंद्रायचारवे ॥ इतितंप्रणम्य ॥
अनंतंवामनंशौरिंवैकुंठंपुरुषोत्तमं ॥ वासुदेवंहृषीकेशंमाधवंमधुसूदनं ॥ वराहं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुंडरीकाक्षंनृसिंहंब्रह्मणःप्रियम् ॥ गोपीशंपद्मपत्राक्षंसर्गस्थित्यंतकारणं ॥ अना
दिनिधनंविष्णुंत्रिलोकेशंत्रिविक्रमं ॥ नारायणंचतुर्बाहुंशंखचक्रगदाधरं ॥
पीतांबरधरंनित्यंवनमालाविभूषितं ॥ श्रीवत्सांकंजगत्सेतुंश्रीपतिंश्रीधरंहरिं ॥
शरणंतुप्रपद्येहंसर्वकामार्थसिद्धये ॥ इतिकृष्णंप्रणमेदितिविशेषः॥ ततःप्रार्थयेत्॥
त्राहिमांसर्वलोकेशहरेसंसारसागरात् ॥त्राहिमांसर्वपापघ्नदुःखशोकार्णवात्प्रभो॥
सर्वलोकेश्वरत्राहिपतितंमांभवार्णवे ॥ त्राहिमांसर्वदुःखघ्नरोगशोकार्णवाद्धरे ॥ दु
र्वृत्तांस्त्रायसेविष्णोयेस्मरंतिसकृत्सकृत्॥सोहंदेवादिदुर्वृत्तस्त्राहिमांशोकसागरात्॥
पुष्कराक्षनिमग्नोहंमाययाज्ञानसागरे॥त्राहिमांदेवदेवेशत्वत्तोनान्योस्तिरक्षिता॥
यद्वाकिंचनकौमारेयौवनेयच्चवार्धके ॥ तत्पुण्यंवृद्धिमायातुपापंहनहलायुध ॥आ
वाहनंनजा०॥ एवंपूजांनिर्वर्त्यस्तोत्रपाठकथाश्रवणादिनाजागरणंकार्यं ॥ अनेन
यथाशक्तिषोडशोपचारपूजनेनसपरिवारश्रीगोपालकृष्णःप्रीयतां ॥ ततोविप्रंसं
पूज्यदक्षिणांदत्वाशिषोगृह्णीयात् ॥ इतिजन्माष्टमीपूजासंपूर्णा ॥ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीगोपालकृष्णायनमः ॥ ॥ भविष्योत्तरांत व्यास ह्मणतात—पूर्वीं भारतीयुद्ध आटोपल्यावर शुचिर्भूत झालेला धर्मात्मा युधिष्ठिर देवकीनंदन श्रीकृष्णाला ह्मणाला ॥ १ ॥ हे गोविंदा, तुझ्या प्रसादानें भयंकर युद्धामध्यें शत्रूंचा फडशा उडविला, व तुझ्या प्रसादानेंच सैन्यामध्यें अर्जुनानें महापराक्रमी कर्णाला मारला ॥ २ ॥ हे जनार्दना, जो भीष्म ह्मणजे

श्रीगणेशायनमः ॥ ॥ भविष्योत्तरे व्यासउवाच ॥ निवृत्तेभारतेयुद्धेकृत
शौचोयुधिष्ठिरः ॥ उवाचवाक्यंधर्मात्माकृष्णंदेवकिनंदनम् ॥ १ ॥ युधि
ष्ठिरउवाच ॥ त्वत्प्रसादेनगोविंदनिहताःशत्रवोरणे ॥ कर्णश्चनिहतःसैन्ये
त्वत्प्रसादात्किरीटिना ॥ २ ॥ जेताकोयुधिभीष्मस्ययस्यमृत्युर्नविद्यते ॥
अजेयोऽपिजितस्सोत्रत्वत्प्रसादाज्जनार्दन ॥ ३ ॥ प्राप्तंनिष्कंटकंराज्यंकृ
त्वाकर्मसुदुष्करम् ॥ आचारोदंडनीतिश्चराजधर्माःक्रियान्विताः ॥४॥

सर्वांला अजिंक्य, युद्धप्रसंगीं ज्याच्या समोर धजणारा योद्धा जगांत कोणी नाहीं, एवढेंच नव्हे, मृत्यु सुद्धां ज्याच्या आज्ञेंत राहतो, अशा इच्छामरणी भीष्माचाही तुझ्या प्रसादानेंच पराभव केला ॥ ३ ॥ देवा, अत्यंत दुष्कर पराक्रम करून निष्कंटक राज्यही तुझ्या कृपेनें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संपादन केलें. शिवाय तुझ्या मुखांतून आचार, दंडनीति, व राजधर्मही त्या प्रत्येकांतील सर्वकर्तव्यांसह ऐकले. ॥ ४ ॥ हे अच्युता, सांप्रतकालीं शुद्ध जन्माष्टमीव्रत ऐकण्याची फार उत्कट इच्छा आहे तरी तें व्रत आतां कृपा करून सविस्तर सांगा ॥ ५ ॥ हें व्रत कोणत्या वेळीं उत्पन्न झालें, याचें पुण्य काय व विधि कशा तऱ्हेचा तें सर्व सांगा ॥ ६ ॥

अधुनाश्रोतुमिच्छामिशुद्धंजन्माष्टमिव्रतम् ॥ तत्सर्वंकृपयाब्रूहिविस्तरे णममाच्युत ॥ ५ ॥ कस्मिन्कालेसमुत्पन्नंकिंपुण्यंकोविधिःस्मृतः ॥ ६ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ शृणुराजन्प्रवक्ष्यामिव्रतानामुत्तमंव्रतम् ॥ यतःप्रभृति विख्यातंफलेनविधिनान्वितम् ॥ ७ ॥ राजवंशसमुत्पन्नैर्दैत्यानीकैःसुपी डिता ॥ धराभारसमाक्रांताब्रह्माणंशरणंययौ ॥ ८ ॥ ॥

असा धर्माचा प्रश्न ऐकून श्रीकृष्ण ह्मणाले—युधिष्ठिरराजा, सर्वव्रतांमध्यें श्रेष्ठ हें व्रत कोणत्या वेळीं प्रसिद्धीस आलें, याचें फल, व याचा प्रकार तुला सांगतों ऐक. ॥ ७ ॥ ज्या वेळीं अनेक दैत्यांचे समुदाय क्षत्रियांतील राजघराण्यांत उत्पन्न झाले व त्यांच्या भारानें आक्रांत झालेली पृथ्वी ब्रह्मदेवाला (गोरूपानें) शरण गेली ॥ ८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या वेळीं ब्रह्मदेवानें स्वस्थ मनानें तिचें असह्य दैत्यभाररूप दुःख जाणून तो सर्व देवांसह श्वेतद्वीपास (ज्या ठिकाणीं भगवान् क्षीराब्धिशेषशायी स्वस्थ विश्रांति घेतात तेथें) गेला ॥ ९ ॥ आणि राजा, या ब्रह्मदेवानें अचंचल बुद्धीनें माझी स्तुति केली, त्या वेळीं त्याच्या स्तुतीनें संतुष्ट होऊन त्या देवांपुढें मी समक्ष दृष्टिगोचर झालों. ॥ १० ॥ मला पाहतांच

ज्ञात्वा तदा प्रभुर्ब्रह्मा भूमेर्भारं समाहितः॥ श्वेतद्वीपं समागत्य सर्वदेवसमन्वितः ॥ ९ ॥ समाहितमतिर्ब्रह्मा मां तुष्टाव विशांपते ॥ स्तुत्या तया हं संप्रीतस्तेषां दृग्गोचरोऽभवम् ॥१०॥ दृष्ट्वा मां प्रणिपत्याशु भक्तिभावसमन्विताः ॥ ब्रह्माणमग्रतः कृत्वा तुष्टाः सर्वे दिवौकसः ॥ ११ ॥ व्यज्ञिज्ञपन्महाराज भूमिभारापनुत्तये ॥ अवधार्य तदा तेषां वचनं चान्वचिंतयम् ॥ १२ ॥

सर्व देव अत्यंत आनंद पावले आणि मोठ्या भक्तिभावानें ब्रह्मदेवाला पुढें करून मला नमस्कार करून ॥ ११ ॥ धर्मराजा, भूमीचा भार दूर होण्याकरितां विनंति करते झाले. त्या वेळीं त्यांची ती विनंति ऐकून मीहि मनामध्यें विचार करूं लागलों कीं, ॥ १२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे क्षत्रियकुळांत उत्पन्न झालेले राक्षस एकाहून एक महाबलवान् महापराक्रमी असून सर्व स्वधर्मनिरत असल्यामुळें यांचा पराभव कोणत्या उपायानें करतां येईल ? ॥ १३ ॥ इत्यादि विचार व पुढें कर्तव्य याचा निश्चय ठरवून मग ब्रह्मदेवाला मीं सांगितलें, तें असें—हे ब्रह्मदेवा, पूर्वीं वसुदेव देवकी या दोघांनींही आपणाला प्रजा व्हावी ह्मणून ॥ १४ ॥

केनोपायेनहंतव्याराक्षसाःक्षत्रियोद्भवाः ॥ स्वधर्मनिरताःसर्वेमहाबलपराक्रमाः ॥ १३ ॥ ततोनिश्चित्यमनसाब्रह्माणमहमब्रवम् ॥ वसुदेवोदेवकीचप्रजाकामौपुरानृप ॥१४॥ भक्त्यामांभजमानौतौतप्तवंतौमहत्तपः ॥ तयोःप्रसन्नःसुप्रीतोयाचेथांवरमित्यहम् ॥ १५ ॥ अब्रवंतावपिततोवरयामासतुःकिल ॥ यदिदेवप्रसन्नोसित्वादृशोनौभवेत्सुतः ॥ १६ ॥

भक्तीनें माझें भजन पूजन करून मोठी तपश्चर्या केली. त्या त्यांच्या भक्तीनें व तपश्चर्येनें मी सुप्रसन्न होऊन त्यांला सांगितलें कीं, मी प्रसन्न झालों, पाहिजे असेल तो वर मागा. ॥ १५ ॥ हें ऐकून वसुदेव व देवकी या दोघांनींहि देवा, तूं जर खरा प्रसन्न झाला असशील तर आह्मांला तुझ्यासारखा पुत्र व्हावा, असा वर मागितला॥ १६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व मीही प्रसन्न अंतःकरणानें तथास्तु, फार चांगलें आहे, तुमचा मनोरथ पूर्ण होईल असा त्यांला वर दिला. तों त्यांचा हेतु पूर्ण व्हावा ह्मणून त्यांच्यापासून मी अवतार (जन्म) धारण करतों ॥ १७ ॥ सर्व देवांनीं व देवस्त्रियांनीं आपआपल्या अंशांनीं तेथें अवतार धारण करावे. जी साक्षात् योगमाया तीहि नंदाचे घरीं यशोदेचे ठिकाणीं अवतार धारण करील.

तथेतिचमयाताभ्यामुक्तंप्रीतेनचेतसा ॥ तत्कामपूरणार्थायसंभविष्याम्य हंतयोः ॥ १७ ॥ दिवौकसोपिस्वांशेनसंभवंतुसुरस्त्रियः ॥ योगमायाचनं दस्ययशोदायांभविष्यति ॥ १८ ॥ देवक्याजठरेगर्भमनंतंधाममामकम् ॥ सानिष्कास्यततस्तूर्णंरोहिण्याजठरेनयेत् ॥ १९ ॥ इतिसंदिश्यतान्सर्वा नहमंतर्हितोभवम् ॥ ततोदेवैःसमंब्रह्मातांदिशंप्रणिपत्यच ॥ २० ॥

॥ १८ ॥ दुसरें, सांप्रत देवकीच्या उदरामध्यें जो गर्भ आहे तो साक्षात् अनंत माझेंच तेज आहे, त्याला तेथून काढून ती अघटित घडविणारी योगमाया रोहिणीच्या (वसुदेवाची दुसरी पत्नी) उदरामध्यें घालील ॥ १९ ॥ असें श्वेतद्वीपांत जमलेल्या सर्व देवांला सांगून व आज्ञा करून मी तेथेंच अंतर्धान पावलों. नंतर त्या सर्व देवांसहवर्तमान ब्रह्मदेवानें त्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिशेला नमस्कार करून ॥ २० ॥ पृथ्वीदेवीचें आश्वासन करून तो आपल्या श्रेष्ठ अशा सत्यलोकास जाता झाला. नंतर मी आपल्या तेजोरूपानें देवकीच्या गर्भांत प्रवेश केला. ॥ २१ ॥ त्या वेळीं देवकीची स्थिति अशी होती कीं, कंसानें वसुदेव व देवकीला बंदिशाळेंत ठेवलेलीं असून देवकीला झालेला प्रत्येक गर्भ मारावा अशा क्रमानें तिचे सहा बाळक मारले होते (व पुढें सातवा गर्भ होता तो अघटितशक्ति योगमायोनें तिच्या उदरांतून काढून

आश्वास्यचमहींदेवींवरधाम्निजगामह ॥ ततोहंदेवकीगर्भमाविशंस्वेनते जसा ॥ २१ ॥ हतेषुषट्सुबालेषुदेवक्याऔग्रसेनिना ॥ कारागृहस्थिता याश्चवसुदेवेनवैसह ॥ २२ ॥ गतेर्धरात्रसमयेसुप्तेसर्वजनेनिशि ॥ भाद्रे मास्यसितेपक्षेऽष्टम्यांब्रह्मर्क्षसंयुजि ॥ २३ ॥

रोहिणीच्या गर्भांत घातल्यामुळें या खेपेस गर्भपात झाला अशी सर्वांची समजूत झाली होती). ॥ २२ ॥ (आठवा गर्भ होण्याच्या वेळींही कंसानें तसाच प्रकार करण्याकरितां देवकीच्या सभोंवतीं खडा पाहारा ठेविला होता.) पुढें अवतारकालीं अशी मजा झाली कीं, श्रावणांतील कृष्णपक्षाच्या अष्टमी दिवशीं रोहिणी नक्षत्र असून बरोबर मध्यरात्र झाली असतां पाहरे-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाले वगैरे सर्वांला गाढ झोंप लागली आहे, ॥ २३ ॥ हे धर्मराज, त्या समयीं सर्वग्रह उच्च शुभस्थानीं आलेले आहेत, सर्वांचीं हृदयकमळें विकसित झालीं आहेत अशा वेळीं मी आपल्या चतुर्भुजरूपानें अवतार धारण केला. ॥ २४ ॥ मला पाहून वसुदेव पहिल्यानें अत्यंत हर्षित झाला आणि कंसापासून भ्यालेला असल्यामुळें शोकानेंही व्याप्त होऊन हात जोडून माझी

सर्वग्रहशुभेकालेप्रसन्नहृदयाशये ॥ आविरासंनिजेनैवरूपेणह्यवनीपते ॥ २४ ॥ वसुदेवोऽपिमांदृष्ट्वाहर्षशोकसमन्वितः ॥ भीतःकंसादतितरांतुष्टावचकृतांजलिः ॥ २५ ॥ पुनःपुनःप्रणम्याथप्रार्थयामाससादरम् ॥ वसुदेवउवाच ॥ अत्यद्भुतमिदंरूपंदुर्दर्शंयोगिनामपि ॥२६॥ यत्तेजसारिष्टगृहमभवत्संप्रकाशितं ॥ उद्विजेभगवन्कंसाद्योमेबालानघातयत् ॥२७॥

स्तुति करूं लागला ॥ २५ ॥ तसाच वारंवार नमस्कार करून आदरपूर्वक प्रार्थना करूं लागला. वसुदेव ह्मणाला, प्रभो, हें यमनियमादियोगसंपन्नालाही दृष्टिगोचर न होणारें अद्भुतरूप ॥ २६ ॥ जें तूं या सूतिकागृहांत प्रकाशित केलेंस तें पाहून माझ्या मनाला फार उद्वेग होतो. कारण हे भगवन्, आजपर्यंत त्या कंसानें माझे सहा बालक मारले ॥ २७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याकरितां देवा, या अलौकिक स्वरूपाचा या वेळीं उपसंहार करावास. हें तुझें रूप चतुर्भुज असून एकेका हातांत शंख, चक्र, गदा, पद्म यांपैकीं एकेक धारण केलें आहे. गळ्यामध्यें कौस्तुभमणि धारण केलेला आहे, ॥ २८ ॥ मस्तकावर किरीटाप्रमाणें हारानें मंडित असा मुकुट आहे, व ज्याचे बाहु बाहुभूषणांनीं सुशोभित आहेत व हातांत रत्नजडित कडीं धारण केलीं आहेत, विजेप्रमाणें चमकणारा पीतांबर परिधान केला आहे. ज्याच्या कंबरेंतील मेख-

उपसंहरतस्मात्त्वमेतद्रूपमलौकिकम् ॥ शंखचक्रगदापद्मलसत्कौस्तुभमालिनम् ॥ २८ ॥ किरीटहारमुकुटकेयूरवलयांकितम् ॥ तडिद्वसनसंवीतं क्वणत्कांचनमेखलम् ॥ २९ ॥ स्फुरद्राजीवताम्राक्षंस्निग्धांजनचयप्रभम् ॥ महामरकतश्यामंकोटिसूर्यसमप्रभम् ॥ ३० ॥

लेच्या क्षुद्रघंटांचा मंजुळ शब्द होत आहे, ॥ २९ ॥ ज्याचे नेत्र आरक्त कमलाप्रमाणें स्फुरण पावत आहेत, स्निग्ध कज्जलाप्रमाणें (मेघासारखी) ज्याची प्रभा पडली आहे, जो महामरकताप्रमाणें श्यामवर्ण असून ज्याची प्रभा एकदम कोटिसूर्य उगवल्याप्रमाणें आहे अशा या रूपाचा उपसंहार कर. ॥ ३० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीकृष्ण ह्मणतात, राजा, याप्रमाणें वसुदेवानें प्रार्थना केली त्या वेळीं तें रूप सोडून मी व्यावहरिक इतर शिशूप्रमाणें लहान बाळ झालों ॥ ३१ ॥ आणि मला एथून आतांच गोकुळांत घेऊन जा असें वसुदेवाला सांगितलें. तेव्हां वसुदेव मला घेऊन नंदाच्या गोकुळांत गेला ॥ ३२ ॥ त्या वेळीं सर्व दरवाजे जरी बंद होते तथापि माझ्या प्रभावानें एकदम

श्रीकृष्णउवाच ॥ एवंसंप्रार्थितोराजन्वसुदेवेनवैतदा ॥ तेनैवनिजरूपेण भूत्वाहंप्राकृतःशिशुः ॥ ३१ ॥ नयमांगोकुलमितिवसुदेवमचोदयम् ॥ समादायागमत्सोपिनंदगोकुलमंजसा ॥ ३२ ॥ द्वाराण्यपावृतान्यासन्मत्प्रभावात्स्वयंनृप ॥ ददौमार्गंचकालिंदीजलकल्लोलमालिनी ॥ ३३ ॥ ततोयशोदाशयनेमांन्यस्यानकदुंदुभिः ॥ तत्पर्यंकस्थितांगृह्यदारिकामागमत्पुनः ॥ ३४ ॥

उघडले गेले. आणि वाटेंत यमुनानदी तुफान भरलेली असून तिला एकसारख्या लाटा येत होत्या तथापि तिनें दुभंग होऊन मार्ग दिला ॥ ३३ ॥ गोकुळांत गेल्यानंतर वसुदेवानें मला यशोदेच्या बिछान्यावर ठेविलें आणि तिच्या बिछान्यावर असलेली कन्या घेऊन पुनः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घरीं आला. ॥ ३४ ॥ घरीं पोंचल्यावर ती कन्या देवकीजवळ ठेवली. पुनः पूर्ववत् आपोआप दरवाजे बंद झाले व वसुदेवानें पायांत बेड्या अडकावून घेतल्या. ॥ ३५ ॥ नंतर ती कन्या मोठ्यानें चोहोंकडे ऐकूं जाईल असें रडूं लागली. तिच्या रडण्याचा शब्द कानांत पडतांच संरक्षणाकरितां ठेवलेले लोक एकदम जागे होऊन उठले ॥ ३६ ॥ आणि देवकी

द्वाराणिपिहितान्यासन्पूर्ववन्निगडंततः ॥ विन्यस्यपादयोरास्तेशयनेन्यस्यदारिकाम् ॥३५॥ ततोरुरोदमहतास्वनेनापूर्यसादिशः ॥ तस्यारुदितशब्देनउत्थिताःपालकागृहात् ॥ ३६ ॥ कंसायागत्यचाचख्युःप्रसूतादेवकीतिते ॥ सोऽपितल्पात्समुत्थायभयेनातीवविह्वलः ॥३७॥ जगामसूतिकागेहंदेवक्याःप्रस्खलन्पथि॥दारिकांशयनाद्गृह्यरुदत्याश्चनिजस्वसुः॥३८॥

बाळंतीण झाल्याचें वर्तमान त्यांनीं येऊन कंसाला सांगितलें. तें कानांत पडतांच भयानें घाबरून एकदम पलंगावरून उठला ॥ ३७ ॥ आणि मार्गांत अडखळत पडत देवकी होती त्या सूतिकागृहांत जाऊन तिच्या बिछान्यावरील त्या कन्येला आपली बहीण देवकी रडत असतां उचलून घेऊन ॥ ३८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या घराच्या बाहेर असलेल्या शिळेवर जोरानें आपटतो एवढ्यांत ती त्याच्या हातांतून निसटून एकदम आकाशांत गेली आणि तेथून ती देवी कंसाला उद्देशून ह्मणाली ॥ ३९ ॥ हे मूर्खा कंसा, मला मारल्यानें फायदा काय? तुझा नाशकर्ता शत्रु कोठें तरी उत्पन्न झाला आहे. हें तिचें भाषण ऐकून तो कंस अंतःकरणांत अगदीं उद्विग्न झाला ॥ ४० ॥ आणि

अपोथयच्छिलापृष्ठेसापितस्यकराच्युता ॥ उवाचकंसमुद्दिश्यदेवीह्याका शगासती ॥३९॥ किंमयाहतयामंदजातःकुत्रापितेरिपुः ॥ इत्युक्तःसोप्य भूत्कंसःपरमोद्विग्नमानसः ॥४०॥ आज्ञापयामाससततोबालानांकदनाय वै ॥ दानवाअपिबालानांकदनंचक्रुरुद्यताः ॥४१॥ वनेषूपवनेष्वेवंपुरग्रा मव्रजेष्वपि ॥ अहंचगोकुलेस्थित्वापूतनांबालघातिनीम् ॥ ४२ ॥

जवळ पाळलेल्या दैत्याला गोकुळांतील सर्व बालकांचा नाश करण्याविषयीं त्यानें आज्ञा दिली. त्याची आज्ञा होतांच ते दैत्यही बाळांचा नाश करण्याला उद्युक्त झाले ॥ ४१ ॥ आणि वनें, उपवनें, तशींच नगरें, गांव, गोकुलें इत्यादि ठिकाणीं हिंडून मुलांचा नाश करूं लागले. मी गोकुळामध्यें राहून मुलांच्या घाताकरितां निघालेली पूतना ॥ ४२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विषानें पूरित स्तनपान करविण्याविषयीं प्रवृत्त झालेली पाहून मी त्या स्तन्याबरोबर तिचे प्राणसुद्धां शोषून घेतले. तसेच तृणावर्त, बकासुर, अरिष्टासुर, धेनुकासुर, केशी ॥ ४३ ॥ आदिकरून अन्यही बाल्यावस्थेंत जेवढे दैत्य आले त्या सर्वांचा नाश करून प्रभाव दाखविला. जरा मोठा झाल्यावर मथुरेंत जाऊन कंसप्रभृति दानवांला मारून ॥ ४४ ॥ सर्व

स्तनंदातुंप्रवृत्तांमेप्राणैःसममशोषयम्॥ तृणावर्तंबकंरिष्टंधेनुकंकेशिनंतथा ॥ ४३ ॥ अन्यानपिखलान्हत्वास्वप्रभावमदर्शयम् ॥ ततश्चमथुरांगत्वा हत्वाकंसादिदानवान् ॥ ४४ ॥ ज्ञातीनांपरमंहर्षंकृतवानस्मिसादरम् ॥ देवकीवसुदेवश्चपरिष्वज्यमुदाथमाम् ॥ ४५॥ आनंदजैर्जलैर्मूर्ध्निसेचयामासतुर्नृप ॥ तस्मिन्रंगवरेमल्लान्हत्वाचाणूरमुख्यकान् ॥ ४६ ॥

ज्ञातिवर्गाला मीं मोठा हर्ष उत्पन्न केला. देवकी व वसुदेव यांनीं मोठ्या आनंदानें कडकडून मला आलिंगन दिलें ॥ ४५ ॥ आणि राजा, त्यांनीं आपल्या नेत्रांतून निघणाऱ्या आनंदाश्रूंनीं माझें सर्वांग आर्द्र केलें. कंसानें केलेल्या रंगमंडपामध्यें चाणूर व मुष्टिक नांवाच्या मल्लांचा नाश केला, ॥ ४६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तसाच कुवलयापीड नांवाच्या हत्तीचा नाश केला, आणि कंसाचे सहस्रावधि बांधव मारले. याप्रमाणें सर्व लोकांचा कंटकरूप जो कंस त्याला मारला असतां ॥ ४७ ॥ व सर्व लोकांला भयंकररूप दुष्ट दैत्यांचा नाश केला असतां सर्व लोक आनंदित व उत्सुक होऊन मोठ्या आदरानें माझ्यापाशीं आले आणि ह्मणाले ॥ ४८ ॥ हे कृष्णा, हे कृष्णा, हे महायोगिन्,

गजंकुवलयापींडकंसभ्रातृननेकशः ॥ एवंहतेऽसुरेकंसेसर्वलोकैककंटके ॥ ४७ ॥ अन्येषुदुष्टदैत्येषुसर्वलोकभयंकरे ॥ लोकाःसमुत्सुकाःसर्वेमामुपेत्योचुरादृताः ॥ ४८ ॥ कृष्णकृष्णमहायोगिन्भक्तानामभयप्रद ॥ प्रलयात्पाहिनोदेवशरणागतवत्सल ॥ ४९ ॥ अनाथनाथसर्वज्ञसर्वभूतहितेरत ॥ किंचिद्विज्ञाप्यतेऽस्माभिस्तंनोवक्तुंत्वमर्हसि ॥ ५० ॥

हे भक्तांला अभय देणाऱ्या देवा, हे शरणागतवत्सला, संसाररूपी प्रलयापासून आमचें संरक्षण कर ॥ ४९ ॥ हे अनाथांच्या नाथा, हे सर्वज्ञा, हे सर्व प्राणिमात्राच्या कल्याणार्थ झटणाऱ्या देवा, आह्मी कांहीं विज्ञापना करून तुला विचारतों तें तूं कृपा करून आह्माला सांग ॥ ५० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देवा, तुमचा जन्मदिवस कोणता हें लोकांस समजत नाहीं तरी तो आह्माला सांग. ह्मणजे आह्मी सर्व तुझ्या जन्मदिवशीं वर्धापनविधीचा (वाढदिवसाचा) उत्साह करूं. ॥ ५१ ॥ हें त्यांचें भाषण ऐकून त्यांची माझे ठिकाणीं अत्यंत श्रद्धा, भक्ति आणि प्रेम हीं पाहून मी निष्कपट मनानें त्यांला माझा जन्मदिवस सांगितला. ॥ ५२ ॥ तो ऐकून

तवजन्मदिनंलोकेनज्ञातंकेनचित्क्वचित् ॥ ज्ञात्वाचतद्दिनंसर्वेकुर्मोवर्धाप नोत्सवम् ॥ ५१ ॥ दृष्ट्वातेषांशुभांभक्तिंश्रद्धांचमयिसौहृदम् ॥ मयाजन्म दिनंतेभ्यः ख्यातंनिर्मलचेतसा ॥ ५२ ॥ श्रुत्वातेप्युत्सवंचक्रुर्विधिनायेन तंशृणु ॥ पार्थैतद्दिवसेप्राप्तेदंतधावनपूर्वकम् ॥ ५३ ॥ स्नात्वापुण्यजले शुद्धेवाससीपरिधायच ॥ निर्वर्त्यावश्यकंकर्मव्रतसंकल्पमाचरेत् ॥ ५४ ॥

ज्या विधीनें त्यांनीं उत्साह केला तो विधी सांगतों ऐक. धर्मा, हा माझा दिवस प्राप्त झाला असतां त्या दिवशीं दंतधावनपूर्वक ॥ ५३ ॥ पुण्यजलानें स्नान करून शुद्धवस्त्रें परिधान करून आपलें नित्यकर्म उरकून व्रताचा संकल्प करावा. ॥ ५४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्व पापाच्या शांत्यर्थ वासुदेवाच्या उद्देशानें श्रावणकृष्णाष्टमीला उपोषण करतों. अशक्तानें 'फलाहारं करिष्यामि' असा ऊह करावा. ॥ ५५ ॥ असा नियम घेऊन पूजेची सामग्री संपादन करून फळांनीं व पुष्पांनीं सुशोभित असा मंडप तयार करावा ॥ ५६ ॥ आणि त्या मंडपांत गंध, पुष्पें, अक्षता इत्यादि निरनिराळे षोडशोपचारांनीं द्वादशाक्षर मंत्रानें

वासुदेवंसमुद्दिश्यसर्वपापप्रशांतये ॥ उपवासंकरिष्यामिकृष्णाष्टम्यांनभस्यहं ॥ ५५ ॥ गृहीत्वानियमंत्वेवंसंपाद्यार्चनसाधनम् ॥ मंडपंशोभनंकृत्वाफलपुष्पादिसंयुतम् ॥ ५६ ॥ तस्मिन्मांपूजयेद्भक्त्यागंधपुष्पाक्षतैःपृथक् ॥ उपचारैःषोडशभिर्द्वादशाक्षरविद्यया ॥ ५७ ॥ सद्यःप्रसूतांजननींवसुदेवंचमारिषम् ॥ बलदेवसमायुक्तांरोहिणींगुणमोहिनीम् ॥ ५८ ॥

माझी पूजा करावी ॥ ५७ ॥ पूजेसाठीं मूर्ति बनविणें त्या अशा—नुक्तीच प्रसूत होऊन जवळ बाळ आहे असी देवकी, व श्रेष्ठ वसुदेव व आपल्या गुणांनीं दुसऱ्याला मोह उत्पन्न करणारी बलरामासह रोहिणी ॥ ५८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंद, यशोदा, गोपी, गोपाळ, गाई, वासरें, गोकुळ, पुण्यकारक यमुना व कन्यारूपी योगमाया ॥ ५९ ॥ यशोदेच्या बिछान्यावर शयन केलेली ती दिव्यकांति कन्या ह्या सर्वांची स्थापना करून निरनिराळी नाममंत्रानें पूजा करावी ॥ ६० ॥ त्या मूर्ति सुवर्ण, रौप्य, ताम्र, मृत्तिका, काष्ठ, पाषाण इत्यादिकांनीं केलेल्या असाव्या किंवा चित्ररूपानें काढलेल्या असाव्या

नंदंयशोदांगोपीश्चगोपान्गाअपिसर्वशः॥ गोकुलंयमुनांपुण्यांयोगमायां चदारिकाम् ॥ ५९ ॥ यशोदाशयनेसुप्तांसद्योजातांवरप्रभाम् ॥ एवंसंपूजयेत्सम्यङ्नाममंत्रैःपृथक्पृथक् ॥ ६० ॥ सुवर्णरूप्यताम्रारमृदादिभिरलंकृताः ॥ काष्ठपाषाणरचिताश्चित्रमय्योऽथलेखिताः ॥ ६१ ॥ प्रतिमा विविधाःप्रोक्तास्तासुचान्यतमायजेत् ॥ रात्रौजागरणंकुर्याद्गीतनृत्यादिभिःसह ॥ ६२ ॥

॥ ६१ ॥ अनेक तऱ्हेच्या प्रतिमा सांगितल्या आहेत त्यांपैकीं आपल्याला अनुकूल असेल त्या कोणत्या तरी एका जातीच्या तयार करून त्यांची पूजा करावी, आणि रात्रौ नृत्य गायन इत्यादि करून जागरण करावें ॥ ६२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुराणें, स्तोत्रपाठ, देवाचें जातकर्म, नामकरण वगैरे उत्साह करावे. दुसरे दिवशीं प्रयत्नानें ब्राह्मणांला भोजन घालून पारणा करावी ॥ ६३ ॥ धर्मराजा, याप्रमाणें हें सर्वोत्तम व्रत केलें असतां इहलोकीं सर्व मनोरथ प्राप्त होतात व अंतीं स्वर्गाला जाऊन आनंद पावतो ॥ ६४ ॥ हें व्रत मोहानें जो न करील तो निरंतर संसाररूपी गव्हरांत (गुहेंत) पडेल.

पुराणैःस्तोत्रपाठैश्चजातनामादिसूत्सवैः ॥ श्वोभूतेपारणंकुर्याद्द्विजान्सं
भोज्ययत्नतः ॥ ६३ ॥ एवंकृतेमहाराजव्रतानामुत्तमेव्रते ॥ सर्वान्कामा
नवाप्नोतिस्वर्गलोकेमहीयते ॥ ६४ ॥ मोहान्नकुरुतेयस्तुयातिसंसारग
ह्वरे ॥ तस्मात्कुर्यात्प्रयत्नेननिष्पापोजायतेनरः ॥ ६५ ॥ अत्रैवोदाहरंती
ममितिहासंपुरातनम् ॥ अंगदेशोद्भवोराजामित्रजिन्नामनामतः ॥६६॥

याकरतां प्रयत्नानें हें व्रत करावें ह्मणजे तो मनुष्य निष्पाप होतो ॥ ६५ ॥ याबद्दल एक पुरातन इतिहास सांगतात तो असा—पूर्वीं अंगदेशामध्यें उत्पन्न झालेला राजा मित्रजित नांवानें प्रसिद्ध होता ॥ ६६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचा सत्यजित नांवाचा मुलगा मोठा तेजस्वी असून तो निरंतर सन्मार्गांत राहणारा होता. हा मोठा धार्मिक असून प्रजांचें रंजन होईल असें राज्याचें पालन करीत असे ॥ ६७ ॥ तो याप्रमाणे न्यायानें वागत असतां कदाचित् दैवयोगानें बहुकालपर्यंत त्याला पाखंडी लोकांचा सहवास घडला ॥ ६८ ॥ त्या सहवासानें तो राजा स्वतः नास्तिक बनून अधर्मतत्पर झाला

तस्यपुत्रोमहातेजाःसत्यजित्सत्पथेस्थितः॥ पालयामासधर्मज्ञोविधिवद्रंजयन्प्रजाः ॥ ६७ ॥ तस्यैवंवर्तमानस्यकदाचिद्दैवयोगतः ॥ पाखंडैःसह संवासोबभूवबहुवासरम् ॥६८॥ तत्संसर्गात्सनृपतिरधर्मनिरतोऽभवत् ॥ वेदशास्त्रपुराणानिविनिंद्यबहुशोनृप ॥ ६९ ॥ ब्राह्मणेषुतथाधर्मेविद्वेषंपरमंगतः ॥ एवंबहुतिथेकालेगतेभरतसत्तम ॥ ७० ॥

आणि हे राजा, वेद, शास्त्रें, पुराणें यांची बहुधा निंदा करूं लागला ॥ ६९ ॥ ब्राह्मणांचा आणि धर्माचा तर फारच द्वेष करूं लागला. हे धर्मा, याप्रमाणें बराच काल निघून गेल्यावर ॥ ७० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कालवश होऊन मरण पावला त्यावेळीं यमदूतांनीं पाशांनीं खचून बांधून यमाच्या समीप नेला ॥ ७१ ॥ तेथें नेल्यावर अनेक प्रकारें ताडन केल्यामुळें फार पीडा पावला. आणि त्या दुष्ट पाखांड्यांच्या सहवासानें तो पातकी झाल्यामुळें त्याला बहुकालपर्यंत नरकांत राहावें लागलें ॥ ७२ ॥ अशी नरकयातना भोगल्यावर शिल्लक राहिलेल्या पातकानें

कालेननिधनंप्राप्तोयमदूतवशंगतः ॥ बद्धापाशैर्नीयमानोयमदूतैर्यमांतिकम् ॥ ७१ ॥ पीडितस्ताड्यमानोसौदुष्टसंगवशंगतः ॥ नरकेपतितः पापोयातनाबहुवत्सरम् ॥ ७२ ॥ भुक्त्वापापस्यशेषेणपैशाचींयोनिमास्थितः ॥ तृषाक्षुधासमाक्रांतोऽभ्रमत्समरुभूमिषु ॥ ७३ ॥ कस्यचित्त्वथ वैश्यस्यदेहमाविश्यगच्छतः॥ सहतेनैवसंप्राप्तोमथुरांपुण्यदांपुरीम् ॥७४॥

त्याला पिशाचयोनि प्राप्त झाली. आणि तो मारवाडांतील निर्जलदेशांत क्षुधा व तृषा यांनीं व्याकुळ होऊन कोठें तरी भ्रमण करीत असे ॥ ७३ ॥ असे कांहीं दिवस लोटल्यावर एकदां त्या मार्गानें एक वैश्य जात असतां त्याच्या देहांत या पिशाचानें प्रवेश केला आणि त्यासह-वर्तमान पुण्यकारक मथुरानगरीला जाऊन पोंचला ॥ ७४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर तेथील मांत्रिकांनीं आपल्या मंत्रसामर्थ्यानें त्या वैश्याच्या शरीरांतून पिशाचाला दूर केला, तेव्हां तो अरण्यांत ऋषींच्या आश्रमांच्या आसपास इकडून तिकडे फिरूं लागला ॥ ७५ ॥ नंतर कदाचित् दैवयोगानें माझा जन्माष्टमीचा दिवस प्राप्त झाला त्या वेळीं व्रत करणारे ऋषि व ब्राह्मण यांनीं केलेली महापूजा ॥ ७६ ॥ आणि रात्रौ नामसंकीर्तनादिकांनीं

तत्रत्यैरक्षकैः सोऽथतद्देहात्तुबहिष्कृतः ॥ बभ्रामविपिनेसोऽपिऋषीणामाश्रमेषुच ॥ ७५ ॥ कदाचिद्दैवयोगेनममजन्माष्टमीदिने ॥ क्रियमाणांमहापूजांव्रतिभिर्मुनिभिर्द्विजैः ॥ ७६ ॥ रात्रौजागरणंचैवनामसंकीर्तनादिभिः ॥ ददर्शविधिवत्सर्वंशुश्रावचहरेःकथाः ॥७७॥ निष्पापस्तत्क्षणादेवशुद्धोनिर्मलमानसः ॥ प्रेतदेहंसमुत्सृज्यविष्णुलोकंविमानतः ॥ ७८ ॥

विधियुक्त जागरण पाहिलें तसेंच मंगलकारक हरीच्या कथाही त्या पिशाचानें ऐकल्या ॥ ७७ ॥ त्या योगानें तत्काळ त्याचीं सर्व पातकें दूर झालीं व तो शुद्ध निर्मळ अंतःकरणाचा झाला आणि प्रेतदेहाचा त्याग करून विमानांत बसून विष्णुलोकाला ॥ ७८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

माझ्या दूतांनीं नेला. या माझ्या व्रताच्या प्रभावानें त्याला दिव्यभोग प्राप्त झाले आणि त्याला दुर्लभ असें माझें सांनिध्य (सामीप्यमुक्ति) प्राप्त झालें ॥ ७९ ॥ तेव्हां हें माझें व्रत नित्य व सर्व मनोरथ पूर्ण करणारें आहे असें तत्त्ववेत्ते ऋषींनीं पुराणादिकांतून वर्णन केलेलें आहे ॥ ८० ॥ हें व्रत कोणतीही कामना असो, सर्व इच्छा पूर्ण करणारें

ममदूतैःसमानीतोदिव्यभोगसमन्वितः ॥ ममसांनिध्यमापन्नोव्रतस्यास्य प्रभावतः ॥ ७९ ॥ नित्यमेवव्रतंचैतत्पुराणेसार्वकामिकम् ॥ गीयतेविधिवत्सम्यङ्मुनिभिस्तत्त्वदर्शिभिः ॥८०॥ सार्वकामिकमेवैतत्कृत्वाकामानवाप्नुयात् ॥८१॥ एतत्तेसर्वमाख्यातंव्रतानामुत्तमंव्रतम् ॥ ममसांनिध्यकृद्राजन्किंभूयःश्रोतुमिच्छसि ॥८२॥ इतिभविष्योत्तरेजन्माष्टमीकथा समाप्ता॥

असल्यानें याचें आचरण करणाराचे सारे हेतु पूर्ण होतात ॥ ८१ ॥ राजा, हें सर्व व्रतांमध्यें श्रेष्ठ व्रत तुला सांगितलें, हें माझी सामीप्यमुक्ति देणारें आहे. यावर पुनः काय श्रवण करण्याची इच्छा आहे? ॥ ८२ ॥ इति श्रीभविष्योत्तरपुराणे जन्माष्टमीकथा संपूर्णा ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आरती कृष्णाची

कोणा शरण गेले विधि त्रिपुरहरणा ॥ गोरूपाभू देवांसह दुःखोद्धरणा ॥ क्षीराब्धिस्थें कोणी येउनियां करुणा ॥ नाभी नाभी गर्जुनि केलें अवतरणा ॥ १ ॥ जय देव जय देव जय मेघश्यामा ॥ ब्रह्मचारी ह्मणविसि भोगुनियां श्यामा ॥ जयदेव जयदेव ॥ ध्रु० ॥ पद लावुनि यमलार्जुन कोणीं उद्धरिला ॥ क्षणमात्रें दावानल कोणीं प्राशियला ॥ बाळपणीं शकटासुर कोणीं नाशियला ॥ बाळक देउन कोणीं गुरु संतोषविला ॥ जय देव जय देव० ॥ २ ॥ वसुदेवासह जातां लावुनियां चरणा ॥ कोणीं उथळ केली अवलीला यमुना ॥ अवतारें अरुणा निजवाहन कोणा ॥ मोहरिनादें कोणा लुब्ध व्रजललना ॥ जयदेव जयदेव० ॥ ३ ॥ भोगुनियां भोगातीत कोणातें ह्मणती ॥ भारत भागवतादि कोणाची ख्याती ॥ ऐसा तूं परमात्मा परब्रह्ममूर्ती ॥ एका जनार्दन हृदयीं ध्याताहे चित्तीं ॥ जय देव जय देव० ॥ ४ ॥

हें पुस्तक वे. शा. रा. रा. वासुदेव लक्ष्मणशास्त्री पणशीकर यांनीं तयार केलें. तें मुंबईमध्यें "निर्णयसागर" छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं आपल्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

शके १८३७, सन १९१५.

PUBLISHER:—Tukaram Javaji, } the "Nirnaya-sagar" Press,
PRINTER:—Ramchandra Yesu Shedge, } 23, Kolbhat Lane, Bombay.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीकृष्णजन्माष्टमीपूजासार्थकथा

समाप्ता ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

[OrderDescription]
,CREATED=12.06.20 14:08
,TRANSFERRED=2020/06/12 at 14:13:12
,PAGES=37
,TYPE=STD
,NAME=S0003131
,Book Name=M-976-SHRIKRISHANJANMASTHAMI PUJA MUDRIT
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF
,FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF
,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection